914

**Government Of Maharashtra**

No.Annayo-2013/C.R. 238/CS-22
Food Civil Supplies and
Consumer Protection Department
Mantralaya. Mumbai- 400 032.
Date :-11.04.2014

आयुक्ताचे कार्यालय

दिनांक ..
क्र. ४/२०४९/९५३

अधीक्षक ... संचालक

To,

The General Manager (Mah.),
Food Corporation of India,
Dheeraj Arma, 2nd floor,
Behrampada, Bandra (E),
Mumbai-400 051.

**Subject - Allocation of foodgrains (Rice and Wheat) at BPL Rates for October,2013 to March, 2014 under Annapurna Schemes of States/UTs.**

Ref:- GOI letter no. 4-6/2013-BP II dtd.19.03.2014.

Sir,

The Ministry of Consumer Affairs, Food and Public Distribution, Government of India vide its letter dated 19th March, 2014 has sanctioned monthly allocation under Annapurna Scheme for the period from October, 2013 to March, 2014 to this state. The Statement showing district wise monthly allocation of foodgrains under this scheme is enclosed herewith. The validity period for depositing of cost and lifting of foodgrains for the period from October, 2013 to March, 2014 will be 45 days and 50 days respectively from the date of issue of Govt. of India's letter dtd. 19.03.2014.

You are requested to issue suitable instructions to the District Managers and release the allocation to respective districts representative, when they approach for the same. The concerned District Authorities are accordingly being instructed in this regard.

Yours Faithfully,

( Hemant Wadikar )
Section Officer to the Govt. of Maharashtra

**प्रत शीघ्र कार्यवाहीस्तव अग्रेषित :-**

१. सर्व उप आयुक्त, (पुरवठा)

२. सर्व जिल्हाधिकारी, (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)

३. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.

४. अपर जिल्हाधिकारी, (ठाणे, मुख्यालय जव्हार)

५. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.

१. केंद्र शासनाने त्यांच्या उपरोक्त दि.१९.३.२०१४ च्या पत्रान्वये राज्याला माहे ऑक्टोबर, २०१३ ते मार्च, २०१४ या कालावधीकरिता अन्नधान्याचे मासिक नियतन मंजूर केले आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी गडचिरोली यांनी त्यांच्या दि १० ५ २०११ रोजीच्या पत्रान्वये जिल्ह्यातील अन्नपूर्णा योजनेचे

सर्व लाभार्थी श्रावणबाळ योजनेअंतर्गत परावर्तीत करण्यात आल्याने सद्यःस्थितीत गडचिरोली जिल्हयात अन्नपूर्णा योजनेअंतर्गत एकही लाभार्थी शिल्लक नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे गडचिरोली जिल्हयास नियतन मंजूर करण्यात आलेले नाही.गडचिरोली जिल्हयास गतवर्षी नियतन मंजूर करण्यात आले नसले तरी त्या जिल्हयाने ११३.१६ मे.टन तांदुळ शिल्लक असल्याचे शासनास कळविले आहे. तरी याबाबतचा खुलासा उप आयुक्त (पुरवठा) नागपूर यांनी त्यांच्याकडून प्राप्त करून शासनास सादर करावा.

२. केंद्र शासनाने राज्याच्या एकूण आवश्यकते पेक्षा कमी नियतन मंजूर केलेले असल्याने जिल्ह्यांनी सादर केलेल्या उपयोगिता प्रमाणपत्रानुसार माहे मार्च, २०१३ अंती जिल्हानिहाय शिल्लक असलेले अन्नधान्य व केंद्र शासनाकडून मंजूर नियतन विचारात घेऊन महिनानिहाय नियतन मंजूर करण्यात आलेले आहे. त्यामुळे ज्या जिल्हयांकडे मार्च, २०१३ अंती अन्नधान्याची शिल्लक ६ महिन्याच्या नियतनाची गरज पूर्ण करण्याइतपत होती अशा नाशिक, सातारा, कोल्हापूर, परभणी, नागपूर (शहर), चंद्रपूर, भंडारा व गोंदिया या जिल्ह्यांना या आदेशान्वये नियतन मंजूर करण्यात आलेले नाही. काही जिल्हयांकडे गहू किंवा तांदुळ शिल्लक असल्याने त्या जिल्हयांना माहे ऑक्टोबर,२०१३ ते माहे मार्च,२०१४ या कालावधीसाठी त्या धान्याकरीता नियतन देण्यात आलेले नाही अथवा कमी प्रमाणात नियतन देण्यात आलेले आहे. काही जिल्ह्यांकडे सहा महिन्याच्या नियतनाची गरज पूर्ण होईल त्यापेक्षाही जास्त शिल्लक अन्नधान्य असल्याचे आढळून आले आहे. तथापि, त्या जिल्ह्यांकडून नियतन आवश्यक असलेल्या जिल्ह्यांकडे नियतन वळती करण्यासाठी नियतनाच्या वाहतूकीची व्यवस्था करणे संयुक्तीक होणार नाही. त्यामुळे ज्या जिल्हयांकडे पुर्वीची शिल्लक नाही त्यांना उपलब्धतेनुसार नियतन देण्यात आलेले आहे. ज्या जिल्हयांकडे पूर्वीची शिल्लक नसून त्यांनी इतर योजनेतून धान्य वळते केले आहे त्यांना नियतन देण्यात आलेले आहे. (अशा जिल्हयांची शिल्लक विवरणपत्रात वजा (-) दर्शविण्यात आलेली आहे.) त्या जिल्हयांनी सदर नियतनातून अन्नधान्याची उचल करून ते धान्य ज्या योजनेतून वळते करून वापरले असेल त्या योजनेत पुन्हा वर्ग करणे आवश्यक आहे.(याबाबतच्या सुचना आदेशामध्ये देण्यात आल्या आहेत.)

३. अन्नपूर्णा लाभार्थी मोजताना जर ते दुबार मोजले गेले असतील उदा. अन्नपूर्णा लाभार्थ्यांस जर अंत्योदय अन्न योजनेचे कार्ड दिले असेल तर सदरची चूक दुरूस्त करण्यात यावी व ते धान्य अन्नपूर्णा लाभार्थ्यांनाच मिळेल याची दक्षता घ्यावी. तसेच मागील महिण्यात असलेली शिल्लक विचारात घेवून पुढील महिण्यासाठी आवश्यक असेल तेवढयाच प्रमाणात धान्याची उचल करावी.

४. सदर योजनेबाबत खालील मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजालणी करावी.

**सदर नियतनाची दरमहा वेळेत व संपूर्ण उचल करावी. या अन्नधान्याची FCI कडे (संबंधित जिल्हा व्यवस्थापक) प्रचलित बीपीएल दराने पैसे भरून उचल करावी** व संबंधित पात्र लाभार्थ्यांना दि.३१ मार्च,२००१ च्या शासन निर्णयातील सूचनानुसार वाटप करण्यात यावे. हे धान्य नियतन भारतीय अन्न महामंडळाकडून उचलण्यासाठी सुरूवातीस रक्कम पीएलए मधून खर्च करावी. प्रत्येक महिन्यात अशा खर्च झालेल्या रकमेच्या भरपाईसाठी वि.स.उ.स. यांच्याकडे मागणी करावी व अन्नपूर्णा योजनेवर होणारा संपूर्ण हिशोब स्वतंत्र ठेवावा. सर्व जिल्हयांनी अन्नपूर्णा योजनेची धान्य खरेदी, वाहतूक, रिबेटस कमिशन इ. सर्व बाबींवर पीएलए मधून केलेल्या खर्चाची माहिती दरमहा नियमितपणे वि.स.उ.स. यांना पाठवून त्याची प्रतिपर्ती

दर तिमाहीस वित्तीय सल्लागारांकडून मिळवून त्या रकमा पीएलए मध्ये भराव्यात. या विषयी सविस्तर सूचना वि.स.उ.स. यांनी स्वतंत्रपणे द्याव्यात.

५. शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार गहू व तांदूळची उचल, वाटप आणि एकूण खर्च याची माहिती प्रत्येक महिन्यास शासनास तसेच वि.स.उ.स. यांना पुढील महिन्याच्या पहिल्या आठवडयापर्यंत सादर करावी. तसेच या नियतनाची उचल व वाटपाबाबतची माहिती दरमहा <u>**"महाफूड आज्ञावली"**</u> मध्ये न चुकता भरली जाईल याची दक्षता घ्यावी. तसेच सन २०१३-१४ च्या सुरूवातीस सन २०१२-१३ मधील शिल्लक , सन २०१३-१४ मध्ये दिलेले एकूण नियतन , त्यानुसार भारतीय अन्न महामंडळाकडून करण्यात आलेली उचल, लाभार्थ्यांना करण्यात आलेले वाटप, तद्नंतर जिल्हयांकडे असलेली शिल्लक याबाबतची माहिती विवरणपत्रात तयार करून शासनास दि.१५.०५.२०१४ पर्यंत विनाविलंब सादर करावी.

६. **<u>माहे ऑक्टोबर, २०१३ ते मार्च , २०१४ या महिन्यांकरिता मंजूर केलेल्या नियतनांची रक्कम भारतीय अन्न महामंडळाकडे जमा करणे व अन्नधान्याची उचल करणे याकरिताचा कालावधी केंद्र शासनाच्या दि.११.०३.२०१४ च्या पत्रापासून अनुक्रमे ४५ व ५० दिवसांपर्यंत राहील.</u>** या योजनेअंतर्गत प्रतिकार्ड वाटण्यात येणारे १० किलो धान्याचे परिमाण, केंद्र शासनाकडून प्राप्त नियतन व जिल्ह्यांकडे माहे मार्च, २०१३ अंती सदर योजनेअंतर्गत शिल्लक असलेले अन्नधान्य विचारात घेऊन जिल्हानिहाय नियतन सोबतच्या विवरणपत्रात दर्शविले आहे. या नियतनाची उचल भारतीय अन्न महामंडळाकडून बीपीएल अन्नधान्याच्या प्रचलित दराने पैसे भरून करावयाची आहे.

तरी सोबतच्या विवरणपत्रातील मंजूर नियतनानुसार या योजनेच्या अन्नधान्याची उचल तात्काळ सुरू करावी व सदर योजनेअंतर्गत मोफत धान्य वाटपाचा लाभ सर्व लाभार्थ्यांना मिळेल याची खात्री करावी.

(हेमंत वाडीकर)
कक्ष अधिकारी

सोबत : विवरणपत्र

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१) वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई.

यांना विनंती करण्यात येते की, जिल्ह्याने अन्नधान्य महामंडळाकडून उचल केलेल्या धान्याचे लेखे सादर करण्यासाठी आवश्यक त्या सविस्तर सूचना आपल्या स्तरावरून स्वतंत्रपणे त्वरेने निर्गमित कराव्यात व त्याची प्रत विभागास पाठवावी.

२) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच नियंत्रक, शिधावाटप यांना विनंती की, त्यांनी सदर आदेशान्वये नियतन विचारात घेऊन अन्नधान्याचे वाटप करावे व वाटपानंतरचा प्रत्येक महिन्यातील अंतिम शिलकीचा अहवाल (progressive report) प्रत्यके महिन्याच्या ५ तारखेस संबंधित विभागाच्या उप आयुक्त (पुरवठा) यांना न चुकता सादर करावा व सर्व उप आयुक्त (पुरवठा) यांनी दरमहिन्याच्या १० तारखेस पुरवठा आयुक्त कार्यालयास सादर करावा व त्या कार्यालयाने **दरमहिन्याच्या १५ तारखेस संपूर्ण** राज्याचा एकत्रित अहवाल राज्य शासनास सादर करावा. तसेच त्याच शिलकीचा

progressive मासिक व वार्षिक अहवाल शासनास सादर करावा. तसेच विनंती करण्यात येते की, सर्व जिल्हयांची या योजनेच्या धान्याच्या उचल व वाटपाबाबतची जिल्हानिहाय माहिती दरमहा संकलित करून पुढील पंधरवडयात उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई व शासनास सादर करावी. तसेच सदर नियतनाचा कालावधी संपल्यानंतर दि. १५.०५.२०१४ पर्यंत सदर योजनेअंतर्गत उचल, वाटप व शिलकीच्या आकडेवारीसह विहीत प्रपत्रात उपयोगिता प्रमाणपत्र शासनास विनाविलंब सादर करावे.

३) उपसंचालक,नागरी पुरवठा पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई

यांना विनंती करण्यात येते की, वरीलप्रमाणे प्राप्त झालेली माहिती तपासून राज्याची एकत्रित माहिती शासनास सादर करावी.

(हेमंत वाडीकर)
कक्ष अधिकारी.

प्रत माहिती साठी सादर.

३) खाजगी सचिव, मा.मंत्री अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण.
४) खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण.

e14

पत्र क्र. अन्नयो-2013/प्र.क्र.238/नापु-22, दि. 11.04.2014 सोबतचे विवरणपत्र.

**Monthly Allocation Annapurna Scheme for the Period from October 2013 to March,2014 (M.T.)**

| Sr.No. | District | No. of beneficiaries | QUANTUM OF FOODGRAIN (KG) | | | Balanced quantity at the end of March,2013 (M.T.) | | | Monthly Allocation (M.T.) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL | WHEAT | RICE | TOTAL |
| 1 | Mumbai | 10481 | 5 | 5 | 10 | 0 | 0 | 0 | 12.935 | 50.907 | 63.842 |
| 2 | Thane | 2402 | 2 | 8 | 10 | 0 | 134 | 134 | 1.220 | 0.000 | 1.220 |
| 3 | Raigad | 2047 | 2 | 8 | 10 | 0 | 0 | 0 | 0.976 | 15.663 | 16.639 |
| 4 | Ratnagire | 815 | 2 | 8 | 10 | 0 | 33.15 | 33.15 | 0.732 | 1.439 | 2.171 |
| 5 | Sindhudurg | 690 | 2 | 8 | 10 | 0 | 501,34 | 501.34 | 0.244 | 0.000 | 0.244 |
| 6 | Nasik | 917 | 5 | 5 | 10 | 119.7 | 121.13 | 240.83 | 0.000 | 0.000 | 0.000 |
| 7 | Ahmednagar | 5533 | 10 | 0 | 10 | 146.37 | 0 | 146.37 | 7.468 | 0.000 | 7.468 |
| 8 | Jalgaon | 2094 | 10 | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 5.125 | 0.000 | 5.125 |
| 9 | Dhule | 1745 | 5 | 5 | 10 | -24.25 | -30.45 | -54.7 | 2.938 | 13.787 | 16.725 |
| 10 | Nandurbar | 1319 | 5 | 5 | 10 | 0 | 65 | 65 | 1.708 | 0.000 | 1,708 |
| 11 | Pune(Rural) | 823 | 10 | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 1.952 | 0.000 | 1.952 |
| 12 | Pune(City) | 235 | 10 | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 0.488 | 0.000 | 0.488 |
| 13 | Satara | 1984 | 10 | 0 | 10 | 129.36 | 0 | 129.36 | 0.000 | 0.000 | 0.000 |
| 14 | Sangli | 1349 | 10 | 0 | 10 | -60.33 | 0 | -60.38 | 5.628 | 0.000 | 5.628 |
| 15 | Solapur (Rural) | 1102 | 10 | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 2.685 | 0.000 | 2.685 |
| 16 | Solapur (City) | 81 | 10 | 0 | 10 | -17.29 | 0 | -17.29 | 0.947 | 0.000 | 0.947 |
| 17 | Kolhapur | 372 | 10 | 0 | 10 | 48.11 | 0 | 48.11 | 0.000 | 0.000 | 0.000 |
| 18 | Aurangabad | 2422 | 10 | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 5.857 | 0.000 | 5.857 |
| 19 | Jalna | 2261 | 10 | 0 | 10 | 24.46 | 0 | 24.46 | 4,618 | 0.000 | 4.618 |
| 20 | Parbhani | 1931 | 10 | 0 | 10 | 1322 | 0 | 1322 | 0.000 | 0,000 | 0.000 |
| 21 | Hingoli | 984 | 10 | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 2.441 | 0.000 | 2.441 |
| 22 | Beed | 2856 | 10 | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 7.078 | 0.000 | 7.078 |
| 23 | Nanded | 2027 | 10 | 0 | 10 | 0 | 0.51 | 0.51 | 4.881 | 0.000 | 4.881 |
| 24 | Latur | 1908 | 10 | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 4.637 | 0.000 | 4.637 |
| 25 | Osmanabad | 1365 | 10 | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 3.417 | 0.000 | 3.417 |
| 26 | Amaravati | 2898 | 5 | 5 | 10 | 0 | 0 | 0 | 3.417 | 14.684 | 18.101 |
| 27 | Akola | 1788 | 10 | 0 | 10 | 0 | 0 | 0 | 4.393 | 0.000 | 4.393 |
| 28 | Washim | 2183 | 5 | 5 | 10 | 54.58 | 43.58 | 98.16 | 0.464 | 3.661 | 4.125 |
| 29 | Yavatmal | 4697 | 5 | 5 | 10 | 0 | 0 | 0 | 5.613 | 23.494 | 29.107 |
| 30 | Buldhana | 3788 | 5 | 5 | 10 | 65 | 107 | 172 | 1.994 | 1.145 | 3.139 |
| 31 | Nagpur(Rural) | 1437 | 5 | 5 | 10 | -34.95 | 42.46 | 7.51 | 3.131 | 0.000 | 3.131 |
| 32 | Nagpur(City) | 5509 | 5 | 5 | 10 | 1916.17 | 172.49 | 2088.66 | 0.000 | 0.000 | 0.000 |
| 33 | Wardha | 2378 | 5 | 5 | 10 | 76.9 | 48.75 | 125.65 | 0.000 | 3.798 | 3.798 |
| 34 | Bhandara | 1133 | 5 | 5 | 10 | 54.72 | 41.35 | 96.07 | 0.000 | 0.000 | 0.000 |
| 35 | Gondia | 1524 | 0 | 10 | 10 | 0 | 448.6 | 448.6 | 0,000 | 0.000 | 0.000 |
| 36 | Chandrapur | 1347 | 5 | 5 | 10 | 102.51 | 86.46 | 188.97 | 0.000 | 0.000 | 0.000 |
| 37 | Gadchiroli | 0 | 0 | 0 | 10 | 0 | 113.16 | 113.16 | 0.000 | 0.000 | 0.000 |
| | Total | 78425 | | | | 3918.06 | 1928.53 | 5846.59 | 96.990 | 128.578 | 225.568 |